# Parjanya Sukta

श्री गणेशाय नमः ।
गंगा गोदावरी माता । वृद्ध माता जगाची जी ।
वंदिली पूजिली माता।आशीर्वाद मिळावया॥**1**॥

पर्जन्य वृष्टी जगासाठी। व्हावया सुखकारक।
जशी पूर्वीस्तुती केली। ऐलुष कवषादिकी॥**2**॥

तीच स्तुती मराठीत। केली माते तुझ्या कृपे।
यश दे, बुद्धी दे माते। स्तवितो मी परोपरी॥**3**॥

स्तुतीसाठी भावभक्ति। तुझ्यापाशी मागितली।
जणु स्तुती तुझी तुच । करविलीनिमित्त मी॥**4**॥

स्तुति तुझी भाव माझे। तोकडे बोल बोबडे।
गोड करी तसे तेही। आशिर्वचन देऊनी॥**5**॥

आधार ऋचा ज्यामूळ। संक्षिप्त भाव हे जरी।
घेऊनी आवश्यचि जे। कैसे संक्षिप्त सूक्त हें॥**6**॥

भावपूर्ती मानूनी घे । संक्षीप्त भाव ही जरी ।
न्यून ते पूर्ण मानोनि। क्षमा करी क्षमा करी॥**7**॥

क्षमा करी कृपाकरी। पूर्तता ही मानोनिया।
पुन्हा पुन्हा प्रार्थितो मी। फलश्रुती तशीच दे॥**8**॥

यश गावे पर्जन्याचे। पर्जन्य वृष्टी व्हावया।
पूर्वी स्तुती केली ज्यांनी। त्या परीच आतां करु॥**9**॥

पर्जन्याची प्रशंसा नी । स्तुती करुं अशा परी।

प्रणतीपूर्वक अशी। मनोभावे सेवा करु॥**10**॥

वीर पुंगव तो करी। गडगडाट वृष्टी ही।
वर्षाव करी तात्काळ सुखवी जनमानस॥**11**॥

वृष्टीरुपे वीर्यबीज ।औषधीत तसेच ते।
प्रविष्ट करीतो बीज । वनस्पतीत ही तसें॥**12**॥

अमृतमय वृष्टीने । आरोग्य पूर्ण औषधी ।
तशाच ही वनस्पती। मानवासाठी जीवन॥**13**॥

प्रचंड वृक्ष पाडी तो। उलथवूनी टाकितो।
सप्पा तसा उडवीतो। राक्षसांचा तसाच तो॥**14**॥

भयंकर शस्त्र त्याचे । पाहतां जग भीतसे।
गाळण उडते त्यांची। गडगडाट ऐकुनी॥**15**॥

पर्जन्य गर्जना करीतो। नाद होतो भयंकर।
पातक्यांना ठार करी। जलवर्षक वीर तो॥**16**॥

भयंकर नादाने त्या। पातकी भीतसे जसा।
निरपराधी ही भीतो। वीराला जलवर्षक॥**17**॥

भितो नी पळतो दूर। निरपराधी ही तसा।
अपराध्या ठार करी। वीर तो जलवर्षक॥**18**॥

मेघ जणू पर्जन्याचे । सारे सेवक शोभती।
सेवकांना अशा साऱ्या। जमवितो एकत्र तो॥**19**॥

गगन सारे भरी तेंव्हा। जगास दिसती सेवक।
पर्जन्य दाखवी जणू । आशादायक दृष्यचि॥**20**॥

आकाश भरतो सारे। मेघांनी ओतप्रोत ते।
गगन मंडल सारे। मेघ रुपें आनंद चि॥**21**॥

तशा स्थितीत मेघांच्या। ऐकू येतात गर्जना।
सिंह नाद जणू होतो। गगनी सारखाचि तो॥**22**॥

सिंहनाद मेघनाद। गर्जना श्रेष्ठ कोणती?।
कळोनी येईना हे की। दोन्हीही सम वाटती॥**23**॥

नभांत इतक्या दूर। होऊनी ऐकू येतसे।
चित्त थरारक नाद। परी आनंद देतसे॥**24**॥

हर्षतो नाचतो जीव। अंतरी भीतसे जरी।
होईल म्हणूनी वृष्टी। हर्ष नी मोद अंतरी॥**25**॥

वाहती वादळे वारे । वीजांचे उत्पात ही।
फुटताती औषधींना। अंकुर ही नवे नवे ॥**26**॥

नभ भरते मेघांनी। जगा पोसावया जणू।
भूवरी धान्य समृद्धि। आणि होतसे विपुल ती॥**27**॥

घडतो हा चमत्कार। पर्जन्य वर्षतो जधी।
वीर्य - वृष्टी वृष्टीरुप। धरणीवर तो तधीं॥**28**॥

सिरसानम्र हो पृथ्वी। ज्याच्या आशे करोनिया।
ज्याच्या केवळ ईच्छेने।बागडूं लागती पशू॥**29**॥

खुरे ज्यांना पशू सारे। फुरफुरती ते तसे।
तशी सारी पशू सृष्टी। उल्हासते नी हर्षतें॥**30**॥

आज्ञेने ज्याच्या धरती। सर्व प्रकारची रुपे।
वनस्पती सृष्टी ही सारी। तृप्त समृध्द होतसे॥**31**॥

असा हे पर्जन्या तूं जो। सुखांचे श्रेष्ठ स्थानचि।
तसा हो सुखवी आम्हा। त्यासाठी प्रार्थितो तुला॥**32**॥

कृपाकरी आम्हांवरी। मरुत हो कृपा तुम्ही।
द्‌युलोकांतून त्या मार्गे। पाण्याचे पूर वाहवा॥**33**॥

समोर गर्जना कर्त्या। पर्जन्या ये मेघांसह।
करीत वृष्टी पाण्याची। ये विपुल जलांसह॥**34**॥

पिता तू परमेशर। आमुचा अससी खरा।
पर्जन्या हे सत्य सारे। आम्हावरी कृपा करी॥**35**॥

गडगडाट कर तूं। मोठ्याने गर्जना कर ।
उदकरुप तो गर्भ भीत ठेव आपुला॥ **36**॥

संचार कर सर्वत्र। जलमय रथातूनी।
मेघरुप पालखीचे। मेघा तोंड खुले करी॥**37**॥

ओढी पालखी उलटी।खाली ओत उपडी।
ज्यामुंळे खांचखळगे। जलमयचि होऊ दे॥**38**॥

पृथ्वीचे उंचवटे ही। ओतप्रोत सारे भरी।
तुडुंब भरी हे सारे। सारे होतील सारखे॥**39**॥

जलमय होऊ दे सारी। धरा वसुंधरा ही ती।
न्हाऊन निघू दे पृथ्वी। तरुण युवती परी॥**40**॥

आपुला जलाशय तो। विस्तृत उचली वर।
नभांत नेई तू त्यास। तेथून कर सिंचन॥**41**॥

भूीवरी खाली करी। करी उदक सिंचन।

आधीच मोकळे केले। कालवे दुथडी वाहूं दे॥**42**॥

दिव्य धृतें करी आर्द्र । आकाश आणि पृथ्वी।
दिव्य जलचि घृत हे । दिव्य जलचि घृत हे ॥**43**॥

अवघ्या पवित्र धेनु। ज्यास धर्मही मानितो।
तान्हेल्या अशा त्यांना। मनमुराद पाणी दे॥**44**॥

मानवी जीव नी पशू। सारेचि तृप्त होऊ दे।
त्यासाठी भ्रीवर तू। संतत धार तू धरी॥**45**॥

तृप्त सारेचि होईतो। धरी संतत धार तू।
प्रार्थितो हे तुला आम्ही। मेघा तू ऐक प्रार्थना ॥**46**॥

दुष्ट अवर्षण त्याचा। मेघा करीशी नाश तू ।
गर्जनेने निनादाने। जोराच्या जलवृष्टीने॥**47**॥

तेव्हा पृथ्वीवर जे जे। चल आणि अचल ही।
नाचू लागे डुलू लागे। आनंदाने खरोखरी॥**48**॥

केलीस वृष्टी तू मेघा। धनत्तर खरोखरी।
तृप्त केली धरा सारी। जलवृष्टी करोनिया॥**49**॥

वालुकामय निर्जल। प्रदेश जलपूर्ण ते।
करुनी तृप्त केलेत। नंदवनचि जणू॥**50**॥

उपजिविका जीवांची। योग्य व्हावी म्हणोनिया।
धान्य निर्मिले त्यासाठी। तशा उत्कृष्ट औषधी ॥**51**॥

घेतलेस धन्यवाद। मनःपूर्वक यामुळे।
लोकांकडून तू मेघा। पर्जन्य वृष्टीच्या मुळें ॥**52**॥

जीवन म्हणती पाण्या। खरोखरीच जीवन।
मानवी जीवनामृत।जीवनसार्थ नाम हे ॥**53**॥

मेघापासूनी निर्माण। होतेविपूल पाणी जे।
उप्तन्न कर्ते जे मेघा। त्या मेघांची स्तुति करुं ॥**54**॥

त्रिप्रकार ॐ काराची। स्तुति तीन प्रकारची।
गाताचि होतसे वृष्टी। आवश्य चि भूीवरी ॥**55**॥

जलवृष्टी वाढवीते।अन्न पाणीही देतसे।
भूवरी अमृतवृष्टी। जलधारा रुपांत ही ॥**56**॥

उत्कर्ष जल यज्ञानें। देवांचा मानवासह।
दोघांचा होतसे याने। या यज्ञाहुतीमुळे ॥**57**॥

सारे जगचि ज्यावरी। राहते अवलंबून।
ज्यामुळे तीनही लोक। चालती हे जलामुळे ॥**58**॥

मेघ सिंचन करिती। विपुल पर्जन्य वृष्टि ती।
तिन्ही लोकां जीवन दे। पर्जन्य उपकारक ॥**59**॥

पर्जन्य वृष्टि साठीच। केलेले स्तोत्र हे असे।
मन:पुर्वक पठणाने । वृष्टी विपुल होतसे ॥**60**॥

फळे फुलें औषधीही। धन, धान्य समृद्धिही।
स्तुतीमुळे मिळो आम्हां। भावनाही धरी मनी ॥**61**॥

त्रिजग कर्ता पर्जन्य। माझे संरक्षण करो।
आयुष्य शतवर्षांचे। उदकाने मिळो मज ॥**62**॥

स्थावर जंगमा मूळ। पर्जन्यचि खरोखरी।
सुजलां सुफलां करी। जगत्रय मोदे भरी ॥**63**॥

संरक्षावे सर्वांगाते। कल्याणही करोनिया।
सदोदित क्षे व्हावे। ही पर्जन्यास प्रार्थना ॥**64**॥

औषधीसह ते अन्न। प्राप्त हो पर्जन्यामुळे।
ही स्तुति त्याच हेतुनें। अन्नौषधी मिळावया ॥**65**॥

विपुल मिळतां सारे। सहज समृद्धि मिळे।
समृद्धि नी अभिवृद्धि। असा उत्कर्ष होवूं दे॥**66**॥

सहासष्ट अशा ओव्या। अनुवादात घेतल्या।
छंदात अनुष्टुभी ज्या। गुंफल्या चरणी वाहिल्या ॥**67**॥

श्री स्वामी समर्थांची। पूजा बांधली वाङमयी।
गोड करी स्वामी राया। प्रार्थना ही तुम्हाप्रती ॥**68**॥